मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » गुरुवार, दि. 27 मार्च 2025 | पान- 1

# चिंचवड स्टेशन लोहमार्गावरील पूल बंद!

## लोहमार्गावरील पुलाचा उताराकडील काही भाग कोसळला : वाहतूक कोंडीत भर

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड स्टेशन लोहमार्गावरील पुलाचा उताराकडील काही भाग कोसळल्याने हा पूल पुन्हा वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. चिंचवड स्टेशन येथून गावात जाणारी हलकी वाहतूक बाजूच्या पुलावरून वळविली आहे. एकच पूल सुरू असल्याने चिंचवड स्टेशन येथील वाहतूककोंडीत भर पडत आहे.चिंचवड स्टेशन ते चिंचवडगाव मार्गावर वर्दळ असते. या पुलामुळे मुंबई-पुणे आणि मुंबई-बंगळुरू महामार्ग जोडले गेले आहेत. लोहमार्गाच्या पूर्व व पश्चिमेकडील नागरी व औद्योगिक पट्टाही जोडला आहे. त्यावर चिंचवड स्टेशन येथील लोहमार्गावर जुळे उड्डाणपूल आहेत.

एक जुना असून, एक नवा आहे. जुना पूल चिंचवडगावाकडे तर, नवा पूल मुंबई-पुणे महामार्गाकडे जातो.



मात्र, जुन्या पुलाच्या क्षमतेबाबत रेल्वे खात्याने पिंपरी-चिंचवड महापालिकेला दोन वर्षांपूर्वी पत्र पाठवले होते. पुलाचा काही भाग जीर्ण झाल्याची बाब पत्रात नमूद आहे. त्यावर वर्षभरापूर्वी महापालिकेने डागडुजी, दुरुस्ती व डांबरीकरणाचे काम केले. त्यानंतर तो वाहतुकीसाठी खुला केला. अवजड वाहनांना प्रवेश बंदी होती. केवळ दुचाकी, तीन चाकी, चारचाकी (हलकी) वाहनांना प्रवेश सुरू होता. आता पुन्हा पुलाचा काही भाग कोसळल्याने तो वाहतुकीसाठी बंद ठेवला आहे. चिंचवड स्टेशन येथून गावात जाणारी हलकी वाहतूक बाजूच्या पुलावरून वळविली आहे.

दोन दिवसांपूर्वी उड्डाणपुलाच्या चिंचवडगावाकडील उतराच्या मार्गाचा काही भाग कोसळल्याचे रेल्वे विभागाने महापालिकेला कळविले. त्यानंतर महापालिका स्थापत्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी रेल्वेच्या अधिकाऱ्यांसमवेत पुलाची पाहणी केली. त्यावर तातडीने दुरुस्ती सुरू करावी, काम पूर्ण होईपर्यंत जुन्या पुलावरील वाहतूक बंद ठेवावी, अशा सूचना रेल्वे अधिकाऱ्यांनी केल्या. त्यावर महापालिका अधिकाऱ्यांनी वाहतूक वळवून दुरुस्तीचे काम हाती घेतले.

चिंचवड स्टेशन लोहमार्गावरील उड्डाणपुलाचा काही भाग जीर्ण झाला आहे. तेथे दुरुस्ती केली जात आहे. या कामावर ताण येऊ नये, म्हणून पुलावरील वाहतूक बंद केली आहे. काम पूर्ण झाल्यानंतर पूल वाहतुकीसाठी खुला करण्यात येईल, असे कार्यकारी अभियंता प्रेरणा सिनकर यांनी सांगितले.

### अवजड वाहनांमुळे कोंडी

**» लोहमार्गावरील उड्डाणपुलाची दुरुस्ती सुरू केल्यामुळे वाहतूक वळवण्यात आली आहे. चिंचवड चौकातून गावात जाणारी आणि तिकडून पुणे-मुंबई महामार्गावर येणारी दोन्ही बाजूंची वाहने एकाच मार्गावर आल्याने कोंडी होत आहे. चिंचवडगावातून जड, अवजड वाहने येत असल्यामुळे पुलावरील कोंडीत भर पडत आहे.**

# पिंपरी महापालिका-जलसंपदा विभागात वाद

## महापालिका आणि जलसंपदा विभागाच्या वादात समाविष्ट गावांतील पाणीपुरवठा 15 दिवसांपासून विस्कळीत

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिका आणि जलसंपदा विभागाच्या वादात समाविष्ट गावांतील पाणीपुरवठा १५ दिवसांपासून विस्कळीत झाला आहे. जलप्रदूषण आणि पाणीपट्टीपोटी ८९ कोटी रुपयांची मागणी करून जलसंपदा विभागाने आंद्रा धरणातून सोडण्यात येणाऱ्या पाण्यात कपात केली आहे. औद्योगिक दराने जलसंपदा विभाग पाणीपट्टी मागत असल्याचा दावा महापालिकेचा आहे, तर वाणिज्य वापराप्रमाणेच पाणीपट्टीची आकारणी करण्यात आली असून, पाणीपट्टी भरल्यानंतर शंभर एमएलडी पाणी देण्याची भूमिका जलसंपदा विभागाने घेतली आहे. महापालिका आणि जलसंपदा विभागाच्या वादात समाविष्ट भागातील नागरिकांना भर उन्हाळ्यात तीव्र पाणीटंचाईला समोरे जावे लागत आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करून राज्य सरकारने भामा आसखेड धरणातील १६७, तर आंद्रा धरणातील शंभर असे २६७ दशलक्ष लिटर (एमएलडी) पाणी शहरासाठी राखीव ठेवले. पहिल्या टप्प्यात आंद्रा धरणातून मे २०२३ मध्ये ५० एमएलडी पाणी निघोजे येथील बंधाऱ्यावरून घेण्यास सुरुवात



केली होती. त्यामध्ये टप्प्याटप्याने शंभर एमएलडीपर्यंत वाढ झाली. चिखलीतील जलशुद्धीकरण केंद्रात पाण्यावर प्रक्रिया करून पाणी वितरित केले जाते. त्यामुळे समाविष्ट गावांतील चिखली, मोशी, जाधववाडी, चऱ्होली, डुडूळगाव, दिघी, तळवडे या भागातील पाणी प्रश्न काही प्रमाणात सुटला होता. मात्र, जलप्रदूषण, थकबाकी असे ८९ कोटी रुपये महापालिकेने द्यावेत, यासाठी जलसंपदा विभागाने आंद्रा धरणातून सोडण्यात येणाऱ्या पाण्यात कपात केली आहे. त्यामुळे मागील १५ दिवसांपासून निघोजे बंधाऱ्यातून शंभर ऐवजी ४० ते ४५ एमएलडी पाणी महापालिकेला मिळत आहे. त्यामुळे पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे.

### नेमका वाद काय?

**» महापालिकेकडून सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते पाणी नदीत सोडणे अपेक्षित आहे. मात्र, महापालिका जेवढे पाणी उचलते, तेवढे पाणी शुद्ध करत नसल्याचा जलसंपदा विभागाचा दावा आहे. महाराष्ट्र जलसंपत्ती नियामक प्राधिकरणाच्या नियमानुसार दंड आकारला जातो. दंडासह ८९ कोटी रुपये महापालिकेने द्यावेत, अशी भूमिका जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांची आहे. आंद्रा धरणातून महापालिकेला शंभरऐवजी ४० ते ४५ एमएलडी पाणी देण्यात येत आहे.**

# सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पासंदर्भात सर्वंकष धोरण

## मोठ्या गृहप्रकल्पात सांडपाणी आणि मैलापाणी प्रक्रिया प्रकल्प उभारणे बंधनकारक

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील गृहसंकुले, मोठ्या गृहप्रकल्पांमध्ये उभारण्यात आलेल्या सांडपाणी शुद्धीकरण प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) बांधकाम पूर्णत्वाचा दाखला मिळाल्यानंतर बंद ठेवले जात असल्याने आता गृहप्रकल्पातील एसटीपी प्रकल्पांसाठी सर्वंकष धोरण तयार केले जाणार आहे. तसेच, सोसायट्यांमधील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वित आहेत की नाही, यावरही ऑनलाइन पद्धतीने लक्ष ठेवले जाणार आहे.



शंभरहून अधिक सदनिका असलेल्या मोठ्या गृहप्रकल्पात सांडपाणी आणि मैलापाणी प्रक्रिया प्रकल्प उभारणे बंधनकारक आहे. त्यानुसार सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प उभारले जातात. मात्र, ते केवळ बांधकाम पूर्णत्वाचा दाखला मिळेपर्यंतच सुरू ठेवले जातात. त्यानंतर प्रकल्प बंद ठेवले जात असल्याने महापालिकेच्या सांडपाणी शुद्धीकरण प्रक्रिया प्रकल्पांवरील ताण वाढत आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेमध्ये अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी सांडपाणी व्यवस्थापनासंदर्भात बैठक घेतली. त्यामध्ये सोसायट्यांवर अंकुश ठेवण्यासाठी सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्पासंदर्भातील सर्वंकष धोरण आखण्याचे निश्चित करण्यात आले.

शहरामध्ये प्रतिदिन एक दशलक्ष लिटर (एमएलडी) एवढ्या पाण्यावर प्रक्रिया होणे आणि त्यानंतर ते नदीपात्रात सोडून देणे अपेक्षित आहे. मात्र, महापालिकेकडील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांची क्षमता कमी आहे. सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी महापालिकेने जायका प्रकल्प हाती घेतला आहे. हा प्रकल्प अद्यापही पूर्ण झालेला नाही. जायका प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर महापालिकेच्या प्रक्रिया प्रकल्पांच्या क्षमतेमध्ये वाढ होऊन प्रतिदिन साडेआठशे ते नऊशे एमएलडी एवढ्या पाण्यावर प्रक्रिया होईल, असा दावा महापालिकेकडून करण्यात आला आहे.

या पार्श्वभूमीवर शहरातील मोठी गृहसंकुले, गृहप्रकल्पांमधील सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यास प्रतिदिन ११० एमएलडी एवढ्या पाण्यावर प्रक्रिया करणे शक्य होणार आहे. त्यामुळे सोसायट्यांच्या आवारातील बंद सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांवर महापालिकेने लक्ष केंद्रित केले आहे.

दरम्यान, शहरातील किती सोसायट्यांमध्ये सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प आहेत, याची कोणतीही अचूक माहिती महापालिका प्रशासनाकडे नाही. मात्र, महापालिकेकडे असलेल्या नोंदीनुसार ६०० सोसायट्यांनी सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्पांसाठी परवानगी घेतली आहे. महापालिकेच्या मलनिस्सारण विभागाने केलेल्या सर्वेक्षणानुसार केवळ २५० सोसायट्यांमध्ये प्रक्रिया प्रकल्प असून, त्यातील २२५ प्रकल्प नियमित आणि पूर्ण क्षमतेने कार्यान्वित असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

### वार्षिक 20 लाखांचा खर्च अपेक्षित

**» सोसायट्यांमधील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प चालविण्यासाठी वार्षिक पंधरा ते वीस लाखांचा खर्च येतो. त्यामध्ये वीज देयके, देखभाल-दुरुस्तीचा खर्चाचा समावेश आहे. प्रक्रिया प्रकल्पामधील शुद्ध झालेले पाणी फ्लशसाठी वापरले जाते. हा प्रकल्प बंद असल्यास सोसायट्यांकडून नियमानुसार दंड आकारला जातो.**

> “ सोसायट्यांमधील बंद प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वित करण्यात येणार आहेत. त्यासाठी लवकरच सर्वंकष धोरण तयार केले जाईल.
>
> **- पृथ्वीराज बी. पी., अतिरिक्त आयुक्त, पुणे महापालिका.**

# जलवाहिनी फुटल्याने पेठांसह अन्य भागातील पाणीपुरवठा विस्कळीत

## जलवाहिनी फुटल्यानंतर पाण्याच्या वेग प्रचंड असल्याने रस्ता उखडला गेला

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेची दांडेकर पूल परिसरातील जलवाहिनी सोमवारी रात्री फुटल्यानंतर मंगळवारी जलवाहिनी दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले. हे काम दिवसभर सुरू राहिल्याने पेठांसह अन्य काही भागातील पाणीपुरवठा विस्कळीत झाला. दरम्यान, या भागाचा पाणीपुरवठा बुधवारी (२६ मार्च) रोजी पूर्ववत होईल, असा दावा महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून करण्यात आला.



पर्वती जलकेंद्रांतून सदाशिव पेठ, शिवाजीनगर परिसराला पाणीपुरवठा करण्यात येतो. सोमवारी रात्री साडेनऊच्या सुमारास दांडेकर पूल परिसरातील ७०० मिमी व्यासाची जलवाहिनी फुटली. जलवाहिनी फुटल्यानंतर पाण्याच्या वेग प्रचंड असल्याने रस्ता उखडला गेला तसेच लाखो लीटर पाणी वाया गेले होते.

हा प्रकार घडल्यानंतर पाणीपुरवठा विभागाकडून तातडीने जलवाहिनी दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले. मात्र दुरुस्तीचे साहित्य पिंपरी-चिंचवड येथील भोसरी येथून मागविण्यात आल्याने ते येण्यास विलंब झाला. त्यामुळे मंगळवारी सायंकाळपर्यंत जलवाहिनी दुरुस्तीचे काम सुरू होते. त्याचा परिणाम मंगळवारी मध्यवर्ती भागा, पेठांचा परिसर आणि शिवाजीनगर येथील पाणीपुरवठ्यावर दिसून आला. या भागाचा पाणीपुरवठा मंगळवारी दिवसभर विस्कळीत होता.

सदाशिव पेठ, नारायण पेठ, कसबा पेठेसह डेक्कन, आपटे रस्ता, गोपाळकृष्ण गोखले रस्ता, सेनापती बापट रस्ता, मॉडेल कॉलनी, जंगली महाराज रस्ता परिसराला सुरळीत पाणीपुरवठा होऊ शकला नाही.

यंदाच्या उन्हाळ्यात शहरावर पाणीकपातीचे सावट निर्माण झाले आहे. शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरणसाखळी प्रकल्पातील पाणीसाठा झपाट्याने कमी होत असल्याने पाणी काळजीपूर्वक आणि काटकसरीने वापरण्याची सूचना जलसंपदा विभागाने महापालिकेला केली आहे. तसेच शहराच्या अनेक भागातील पाणीपुरवठाही गेल्या काही दिवसांपासून विस्कळीत झाला आहे. त्याबाबतच्या तक्रारी सातत्याने महापालिकेच्या पाणीपुरवठा विभाग आणि क्षेत्रीय कार्यालयांकडे करण्यात येत आहेत.

दरम्यान, दांडेकर पूल परिसरातील जलवाहिनी दुरुस्तीचे काम उशिरापर्यंत सुरू राहिले. त्यामुळे पाणीपुरठा विस्कळीत झाला. मात्र बुधवारी या सर्व भागाला योग्य आणि पुरेशा दाबाने पाणीपुरवठा केला जाईल. तसेच पेठांचा भाग आणि शिवाजीनगर मधील नागरिकांसाठी काही काळ जास्त पाणी सोडले जाईल, असे पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप यांनी सांगितले. पाणीपुरवठा विस्कळीत झालेल्या भागातून टँकरची मागणी आल्यानंतर त्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठाही महापालिकेडून करण्यात आला.

# शहरात हजारो हॉटेलस्; फायर एनओसी फक्त 186 जणांकडेच

## तर 273 हॉटेल चालकांनी पिंपरी चिंचवड अग्निशामक विभागाकडे अर्ज केला आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

प्रत्येक हॉटेलमध्ये गॅस सिलिंडरचा वापर होत असतो. त्यातील काही हॉटेलला आग लागल्याच्या घटना घडल्या आहेत. पिंपरी चिंचवड शहरात हजारो हॉटेल आहेत. मात्र आत्तापर्यंत केवळ १८६ हॉटेल चालकांनीच फायर एनओसी घेतली आहे. तर २७३ हॉटेल चालकांनी पिंपरी चिंचवड अग्निशामक विभागाकडे अर्ज केला आहे. अनेक हॉटेल चालक अग्निरोधक यंत्रणा बसवत नसल्याने ग्राहकांचा जीव धोक्यात आला आहे.

हॉटेलमध्ये फायर सेफ्टीसाठी अग्निसुरक्षा मानकांचे पालन करणे आवश्यक आहे. यासाठी, फायर अलार्म, स्प्रिंकलर, अग्निशामक यंत्रे, इमर्जन्सी लाइट्स, आणि सुटकेचे मार्ग दर्शविणारी चिन्हे असणे आवश्यक आहेत. कोणत्याही परिस्थितीत आग लागणे हा एक गंभीर धोका आहे आणि हॉटेलमधील आगीही त्याला अपवाद नाहीत.

हॉटेलमध्ये सिलिंडरचा मोठा साठा असतो. त्यामुळे हॉटेलमध्ये येणारे ग्राहक, मुक्कामी पाहूणे आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी अग्निसुरक्षा उपाययोजना करणे, त्यांचा वारंवार सराव करणे आणि अग्निशामक नियम आणि नियमांबद्दल अद्ययावत राहणे महत्वाचे आहे.



### हॉटेल इमारतीची नियमितपणे तपासणी करा

» हॉटेल्ससाठी दरवर्षी अग्निसुरक्षा तपासणी अत्यंत महत्त्वाची असते, परंतु तरीही बरेच हॉटेल मालक या सेवांकडे दुर्लक्ष करतात. अग्निसुरक्षा व्यवस्थेचे पालन न केल्याने उपकरणे धोक्यात येतात. भविष्यात सदोष उपकरणांचा धोका निर्माण होऊ शकतो.

### अलार्मची चाचणी घ्या

हॉटेल व्यवस्थापनाने अग्नि अलार्म सिस्टमची नियमितपणे चाचणी केली जाते याची खात्री करणे महत्वाचे आहे. बहुतेक सिस्टमची नियंत्रण पॅनेलद्वारे सहजपणे चाचणी केली जाऊ शकते.

### अग्निशामक यंत्रे जवळ असावीत

तुमच्या हॉटेलमध्ये बहुउद्देशीय अग्निशामक यंत्रे असावीत जी लाकूड, कागदी तेल आणि वायूंसारख्या लहान आगींसाठी योग्य आहेत. संपूर्ण इमारतीत अंदाजे ७५ फूट अंतरावर ठेवावेत.

### हॉटेलमध्ये स्मोक गार्ड लावा

स्मोक गार्डमध्ये अग्नि आणि धूर पडदे प्रणाली प्रदान करतो. हा पडदा केवळ हॉटेलची इमारत आणि त्यातील ग्राहकांना सुरक्षित ठेवत नाही तर हॉटेलच्या सौंदर्याच्या दृष्टीने देखील आकर्षक आहेत.

हॉटेलमध्ये फायर सेफ्टीसाठी अग्निसुरक्षा मानकांचे पालन करणे आवश्यक आहे. यासाठी, फायर अलार्म, स्प्रिंकलर, अग्निशामक यंत्रे, इमर्जन्सी लाइट्स, आणि सुटकेचे मार्ग दर्शविणारी चिन्हे असणे आवश्यक आहेत. कोणत्याही परिस्थितीत आग लागणे हा एक गंभीर धोका आहे आणि हॉटेलमधील आगीही त्याला अपवाद नाहीत.

### हॉटेलमध्ये फायर सेफ्टीसाठी काय करावे?

- » हॉटेलच्या प्रत्येक भागात फायर स्प्रिंकलर, स्मोक आणि फायर डिटेक्टर असावेत.
- » डक्ट स्मोक डिटेक्टर असावेत.
- » ऑटोमेटेड फायर अलार्म सिस्टम असावी.
- » इमर्जन्सी लाइट्स असाव्यात.
- » एंट्री आणि एस्केप साइनेज असावेत.
- » पोर्टेबल अग्निशामक यंत्रे असावीत.
- » विशेष धोका आणि किचन फायर सप्रेशन सिस्टम असावी.

### कर्मचाऱ्यांना आपत्कालीनचे प्रशिक्षण द्या

» हॉटेल व्यवस्थापनाने प्रत्येक कर्मचाऱ्याला आपत्कालीन कृती आराखडा पुरवला पाहिजे जेणेकरून सर्वांना जवळचे बाहेर पडण्याचे मार्ग आणि आगीपासून बचाव करण्यासाठी कोणती प्रक्रिया आहे याचे प्रशिक्षण देणे महत्वाचे आहे.

# पिंपरी-चिंचवड महापालिका रुग्णालयात नेमणार निरीक्षक

## रुग्णालयात निरीक्षक म्हणून कामकाज करण्यासाठी संधी देण्यात येणार आहे, त्याला महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी मान्यता दिली

**पिंपरी | प्रतिनिधी**

खासगी वैद्यकीय संस्थेत वैद्यकीय शिक्षण घेतलेल्या किंवा घेत असलेल्या विद्यार्थ्यांना पदव्युत्तर संस्था, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयासह महापालिकेच्या इतर रुग्णालयात निरीक्षक म्हणून कामकाज करण्यासाठी संधी देण्यात येणार आहे. त्याला महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी मंगळवारी (दि. २५) मान्यता दिली. पिंपरी येथील महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत पार पडलेल्या स्थायी समितीच्या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर यांच्यासह सर्व विभागांचे प्रमुख तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.



### किमान 1 महिना ते कमाल 6 महिने प्रशिक्षणाचा कालावधी

» यासाठी विद्यार्थ्यांना महापालिकेकडे शुल्क भरावे लागणार आहे. भारतीय विद्यार्थ्यांसाठी प्रति दिन प्रती खाट ३०० रुपये ( महिन्याला ९,००० रुपये) शुल्क आकारले जाईल. तर परदेशी विद्यार्थ्यांसाठी याचे तीनपट शुल्क आकारले जाईल. दरवर्षी शुल्कामध्ये १० टक्के वाढ होणार आहे. तसेच विद्यार्थ्यांना एक महिन्याचे शुल्क आगाऊ भरावे लागणार आहे.

खासगी व शासकीय संस्थेतील विद्यार्थ्यांना वैद्यकीय, दंत, आयुर्वेद, युनानी, होमिओपॅथी पदवी अभ्यासक्रम, भौतिकोपचार, व्यवसायोपचार यांसारखे निमवैद्यकीय पदवी अभ्यासक्रम व परिचर्या विषयक पदवी, पदविका अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षणासाठी राज्य शासनाने दिलेल्या अटी शर्तीनुसार करारनामा करण्यात येणार आहे. याअंतर्गत वैद्यकीय व संबंधित क्षेत्रातील अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या किंवा शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना अल्प दरात महापालिका रुग्णालयांमध्ये प्रशिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या प्रशिक्षणाअंतर्गत विद्यार्थ्यांना निरीक्षक म्हणून कामकाज करण्याची संधी मिळणार आहे. यामध्ये खाजगी वैद्यकीय संस्थेत बीएएमएस, बीएचएमएस, बीयुएमएस, एमबीबीएस, एमडी, एमएस, पीजी डिप्लोमा, डीएनबी, डीएम, एमसीएच, एमडीएस, एमएसडब्ल्यू, एमबीए (हॉस्पिटल ॲडमिनिस्ट्रेशन) तसेच समकक्ष अभ्यासक्रम पूर्ण केलेले विद्यार्थी या प्रशिक्षणासाठी अर्ज करू शकतात.

### कशी असेल प्रक्रिया?

» विद्यार्थ्यांनी अर्ज सादर केल्यानंतर रुग्णालयातील गरज व उपलब्धतेनुसार परवानगी दिली जाईल. संबंधित विद्यार्थ्यांना महापालिकेशी करार करावा लागेल. परवानगी मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांना यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय व इतर महापालिका रुग्णालयांमध्ये प्रशिक्षणाची संधी मिळेल.

# तळेगाव-चाकण-शिक्रापूर मार्गाची लालफित मोकळी होणार?

## अर्थसंकल्पात 6 हजार 499 कोटी रुपयांची तरतूद केल्याने या रस्त्याचे काम आता तरी मार्गी लागणार का, असा सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

गेली 25 वर्षे लालफितीत अडकून पडलेल्या तळेगाव-चाकण-शिक्रापूर या रस्त्याच्या सुमारे 25 किलोमीटर लांबीच्या चारपदरी रस्त्याचे कामासाठी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नुकताच 2025-26 च्या अर्थसंकल्पात 6 हजार 499 कोटी रुपयांची तरतूद केल्याने गेली. 25 वर्षे लालफितीत अडकून पडलेल्या या रस्त्याचे काम आता तरी मार्गी लागणार का, असा सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

पुणे-नाशिक महामार्गावरील वाढत्या वाहतूक कोंडीच्या पार्श्वभूमीवर चाकण येथील तळेगाव चौकातील सेवारस्त्यांची रुंदी वाढविण्यात आली आहे. चौकात वाहनांच्या लांबपर्यंत रांगा लागू नयेत आणि वाहने चौकातून पुढे सहजपणे जावीत, हा त्यामागचा उद्देश आहे. मात्र, या उपाययोजना काही अंशीच परिणामकारक ठरत असल्याचे वाहतूक कोंडीने स्पष्ट झाले आहे. त्यामुळे चाकणमधील प्रस्तावित बाह्यवळण मार्ग आणि रिंगरोड झाल्यास या महामार्गांची प्रस्तावित कामे होण्यापूर्वी वाहतुकीच्या कोंडीतून सुटका होईल, अशी अपेक्षा नागरिक, प्रवासी व्यक्त करीत आहेत.

मागील अनेक वर्षे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) बाह्यवळण मार्गाचे आश्वासन देत असले, तरी प्रत्यक्षात काहीही काम झालेले नाही. वडगाव-तळेगाव-चाकण ते शिक्रापूर या महामार्गावरील प्रचंड अवजड वाहतूक, नागमोडी वळणे, कमी रुंदी आणि अपघातप्रवण ठिकाणे, यामुळे हा महामार्ग धोकादायक ठरत आहे. या रस्त्याचे गेली अनेक वर्षे लालफितीत अडकलेले काम सुरू होण्याची नागरिकांना अपेक्षा होती.

पुणे जिल्ह्यासाठी रिंगरोड प्रस्तावित आहे. त्याचे काम सुरू करण्याच्या हालचालींना वेग आला आहे. या रस्त्यामुळे या भागातील वाहतूक कोंडी दूर होऊन राष्ट्रीय महामार्ग, राज्य मार्ग, पुणे-मुंबई द्रुतगती मार्ग याची थेट कनेक्टिव्हिटी वाढणार आहे. खेड तालुक्यातील खालुंब्रे, निघोजे, मोई, कुरुळी, चिंबळी, केळगाव, आळंदी देवाची, चऱ्होली खुर्द, धानोरे, सोळू, मरकळ, गोलेगाव आणि मावळ तालुक्यांतील परंदवाडी, उर्से, तळेगाव दाभाडे, वडगाव, कातवी, आंबी, वराळे, आकुर्डी, नाणोलीतर्फे चाकण, इंदुरी, सुदवडी, सुदुंबरे या गावांतून रिंगरोड जाणार आहे. यामुळे वाहतूक कोंडीतून मुक्तता होणार असल्याचे सांगितले जात आहे.

पुण्याजवळील वाहतूक कोंडी कमी होईल. या प्रकल्पामध्ये सध्याच्या दुपदरी रस्त्याचे चौपदरी उन्नत महामार्गात रूपांतर करणे आणि तळेगाव ते चाकणदरम्यान महत्त्वाच्या ठिकाणी उड्डाणपूल बांधणे समाविष्ट आहे. या प्रकल्पासाठी अंदाजे 6,499 कोटी खर्च अपेक्षित असून, तो टोलवसुली किंवा कर्जाद्वारे उभारला जाणार आहे. एमएसआयडीसी या प्रकल्पाची अंमलबजावणी करणार असल्याचे महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाकडून स्पष्ट केले आहे.



### बाह्यवळण मार्गाची हद्द निश्चिती करण्यात येणार

» चाकण औद्योगिक भागातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी चाकणजवळील रासे फाटा, कडाचीवाडी, मेदनकरवाडी भागातून प्रस्तावित बाह्यवळण मार्गाची हद्द निश्चिती करण्यात येणार असल्याचे प्रशासनातील अधिकारी सांगत आहेत. मागील अनेक वर्षे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) बाह्यवळण मार्गाचे आश्वासन देत असले, तरी प्रत्यक्षात काहीही काम झालेले नाही. वडगाव-तळेगाव-चाकण ते शिक्रापूर या महामार्गावरील प्रचंड अवजड वाहतूक, नागमोडी वळणे, कमी रुंदी आणि अपघातप्रवण ठिकाणे, यामुळे हा महामार्ग धोकादायक ठरत आहे. या रस्त्याचे गेली अनेक वर्षे लालफितीत अडकलेले काम सुरू होण्याची नागरिकांना अपेक्षा होती.

### जमीन अधिग्रहणला येणार वेग?

» मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाल्यानंतर आता जमीन अधिग्रहण आणि निविदा प्रक्रियेला वेग येणार आहे. तळेगाव ते चाकण या 25 किलोमीटर लांबीत चारपदरी उन्नत मार्ग प्रस्तावित आहे. तळेगाव, चाकण ते शिक्रापूर हा एकूण 53 किलोमीटर लांबीचा महामार्ग आहे. हा महामार्ग राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 48 (मुंबई-पुणे महामार्गाला) तसेच राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 753 पुणे-संभाजीनगर महामार्गाशी जोडणार आहे. यामुळे पुण्याजवळील वाहतूक कोंडी कमी होईल. या प्रकल्पामध्ये सध्याच्या दुपदरी रस्त्याचे चौपदरी उन्नत महामार्गात रूपांतर करणे आणि तळेगाव ते चाकणदरम्यान महत्त्वाच्या ठिकाणी उड्डाणपूल बांधणे समाविष्ट आहे. या प्रकल्पासाठी अंदाजे 6,499 कोटी खर्च अपेक्षित असून, तो टोलवसुली किंवा कर्जाद्वारे उभारला जाणार आहे. एमएसआयडीसी या प्रकल्पाची अंमलबजावणी करणार असल्याचे महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाकडून स्पष्ट केले आहे.

# शिरूर नगर परिषदेची थकीत कर वसुली विरोधात मोहीम तीव्र

## शिरूर नगर परिषदेने थकीत मालमत्ता धारकांची नावे मुख्य चौकात प्रदर्शित करण्याचा घेतला निर्णय

**पुणे | प्रतिनिधी**

शिरूर नगर परिषद घोडनदीच्या करसंकलन विभागाने थकबाकीदारांविरुद्ध कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. आर्थिक वर्ष संपण्यास काही दिवसच शिल्लक असल्याने कर वसुली मोहीम अधिक तीव्र करण्यात आली आहे.

नगर परिषदेच्या नियमानुसार, मालमत्ता कर व पाणीपट्टी दरवर्षी १ एप्रिल रोजी भरावा लागतो. तसेच, पहिल्या सहा महिन्यांच्या आत कर भरणे बंधनकारक आहे, अन्यथा महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायत आणि औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या कलम १५० अ (१) नुसार थकबाकीदारांवर दरमहा २% शास्ती आकारली जाते.

दिनांक २५ मार्च २०२५ रोजी, नगर परिषदेच्या पथकाने मटन मार्केटमधील एका गाळ्याला सीलबंद करण्याची कारवाई मुख्याधिकारी प्रितम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली केली. यावेळी अक्षय बनगीनवार, दीपक कोल्हे, मोहन गुरव, तेजस शिंदे, अमृत भवर, भगवान आगोणे आणि इतर कर्मचारी उपस्थित होते. याशिवाय,थकीत पाणीपट्टीमुळे आतापर्यंत ६८ नळजोडण्या खंडित करण्यात आल्या आहेत. पुढील काळातही थकीत मालमत्तेची जप्ती तसेच नळ कनेक्शन खंडित करण्याची कारवाई सुरू राहणार आहे.

मुख्याधिकारी श्री. प्रितम पाटील यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, "थकीत कर न भरणाऱ्या मिळकत धारकांची नावे शहरातील मुख्य चौकात फलकांवर प्रदर्शित करण्यात येणार आहेत. त्यामुळे संभाव्य कारवाई टाळण्यासाठी नागरिकांनी त्वरित कर भरावा."



### थकबाकीदारांची नावे मुख्य चौकात प्रदर्शित करण्याचा इशारा

» नगर परिषदेकडून नागरिकांना वेळोवेळी कर भरण्यासाठी मोबाईल संदेश पाठवण्यात आले. तसेच, डिसेंबर २०२४ पासून शहरात १० घंटा गाडीच्या माध्यमातून दवंडीही दिली जात आहे. नागरिकांच्या सोयीसाठी सुट्टीच्या दिवशी (शनिवार, रविवार) देखील नवीन प्रशासकीय इमारतीतील नागरी सुविधा केंद्र तसेच जुन्या नगर परिषद कार्यालयात अतिरिक्त वसूली केंद्र सुरू ठेवण्यात आले आहे. त्याचबरोबर, नागरिकांना घरबसल्या "Shirurnp.org" या संकेतस्थळावरून ऑनलाईन कर भरण्याची सुविधा देखील देण्यात आली आहे.

### वेळेत कर भरून दंड व कारवाई टाळावी

» शिरूर नगर परिषदेकडून थकबाकीदारांसाठी कठोर भूमिका घेतली जात असली, तरी नागरिकांनी वेळेत कर भरून अनावश्यक कारवाई टाळावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.